# मुंबई विद्यापीठ

URGENT

आस्थापना - १

क्र.इएसटी/आयसीडी/२०१३-१४/६४८,
मुंबई - ४०० ०३२.
५ जुलै, २०१३.

परिपत्रक :-

**विषय : जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत...**

विद्यापीठांतील सर्व विभागाचे संचालक, विभाग प्रमुख, सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, परिक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहाय्यक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागाचे / कक्षाचे प्रमुख यांना याद्वारे कळविण्यात येते की, कार्यालयीन परिपत्रक क्रमांक १)आस्था-१/४१/७४,दिनांक १७ जानेवारी, २००६, २)आस्था -१/ ४१/३४८, दिनांक १६ ऑगस्ट, २००७, ३)आस्था-१/४१/१२३, दिनांक २१ एप्रिल,२००९ व ४)आस्था-१/४१/२७, दिनांक १४ फेब्रुवारी, २०११ अन्वये जात वैधता प्रमाणपत्र सादर करणेबाबत विद्यापीठातील कर्मचा-यांना वेळोवेळी कळविले आहे. त्याप्रमाणे बहुतांश मागासवर्गीय कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केले आहे. परंतु अद्यापही काही कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र तसेच जात वैधता पडताळणी प्रस्तावही सादर केलेला नाही.

त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी -२०१२/ प्र.क्र. ३३२ /१२/१६-ब, दिनांक १८ मे, २०१३ अन्वये शासकीय /निमशासकीय इत्यादीच्या सेवेमध्ये कार्यरत असलेल्या मागासवर्गीय कर्मचा-यांपैकी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग या प्रवर्गामधील) ज्यांनी अद्याप जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्यासाठी जात पडताळणी समितीकडे अर्ज सादर केला नाही अशा कर्मचा-यांनी, आपल्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी, आवश्यक त्या परिपूर्ण कागदपत्रांसह, अर्ज, संबंधित जात पडताळणी समितीकडे दिनांक ३१.०७.२०१३ पर्यंत करावा व त्याबाबतची पोचपावती संबंधित कार्यालयातील आस्थापना अधिकारी यांना तात्काळ सादर करावी. तसेच प्रत्येक कार्यालयातील आस्थापना अधिका-यांनी त्यांच्या कार्यालयात कार्यरत असणा-या मागासवर्गीय कर्मचा-यांपैकी सर्व कर्मचा-यांनी दिनांक ३१.०७.२०१३ पर्यंत जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्याबाबतचे प्रस्ताव जात पडताळणी समितीस सादर केलेले आहेत याची खातरजमा पावतीसह करुन घ्यावी, असे नमूद करून उपरोक्त मुदतीत जे मागासवर्गीय कर्मचारी आपल्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्याबाबतचा अर्ज, संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करणार नाहीत, अशा कर्मचा-यांवर, ते आपला जातीचा दावा सिध्द करु शकत नाहीत असा ठपका ठेवून, त्यांना एक महिन्याच्या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्राची पूर्तता करण्यासाठी एक महिन्याची नोटीस देण्यात यावी. तद्नंतरही जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता न करणा-या संबंधित कर्मचा-यांच्या बाबतीत सदर कायद्यातील कलम-१० नुसार त्यांच्या सेवा समाप्त करण्याची कारवाई करण्यात यावी, असे आदेश आहेत. (याबाबतचे दिनांक १८ मे, २०१३ चे शासन परिपत्रंक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)

त्या अनुषंगाने आपणास विनंती करण्यात येते की, हे परिपत्रक आपल्या प्रशासकिय नियंत्रणाखालील शिक्षकेतर कर्मचा-यांच्या निर्दशनास आणून द्यावे.

५/७/१३

(डॉ.एम.ए खान )
कुलसचिव

२/-